Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार, दि. १६ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १८ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

धुळ्यात अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई
(पान २ वर)



» Selected

### वेतनाअभावी जळगाव मनपाच्या घंटागाडी कर्मचाऱ्यांचा 'काम बंद'

**जळगाव :** जळगाव महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील कंत्राटी घंटागाडी कर्मचाऱ्यांनी दीड महिन्यांपासून वेतन न मिळाल्याच्या निषेधार्थ मंगळवारपासून 'काम बंद' आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे शहरातील घराघरातून कचरा संकलनाची सेवा पूर्णपणे ठप्प झाली असून स्वच्छता व्यवस्था विस्कळीत होण्यास सुरुवात झाली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या आंदोलनामुळे सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बीव्हीजी (BVG) ग्रुप या कंत्राटदार कंपनीकडे सोपविले आहे. कर्मचाऱ्यांना गेल्या दीड महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पगार रखडल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाल्याचे आंदोलकांनी सांगितले.

## स्मार्ट मीटरवरून संताप: सांगली, बुलढाणा, गडचिरोली, ठाणे, अनेक ठिकाणी आंदोलन

# वाढीव वीजबिलांच्या आरोपांनी ग्राहक रस्त्यावर

## स्मार्ट मीटरविरोधात राज्यभर आंदोलन • वाढीव वीजबिलांचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । महाराष्ट्रात स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या मोहिमेला अनेक भागांत नागरिकांकडून तीव्र विरोध होत आहे. वाढीव वीजबिले, ग्राहकांची संमती न घेता मीटर बसविणे आणि प्रशासनाच्या कथित मनमानीविरोधात विविध जिल्ह्यांमध्ये आंदोलने उभारण्यात आली आहेत.**

दुसरीकडे महावितरण आणि राज्य सरकारकडून मात्र स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढत नसल्याचा दावा करण्यात येत आहे.सांगलीमध्ये स्मार्ट मीटरविरोधात नागरिकांनी आंदोलन छेडले असून, सक्तीची मोहीम थांबविण्याची मागणी केली आहे. आंदोलनकर्त्यांनी तीव्र भूमिका घेत महावितरणने सक्ती सुरूच ठेवल्यास व्यापक आंदोलनाचा इशाराही दिला आहे. नाशिक जिल्ह्यातील मनमाडमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महावितरणच्या विरोधात आंदोलन करत स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध दर्शविला. तर सटाणा शहरात नागरिकांनी मीटर बसविण्यासाठी आलेल्या



अधिकाऱ्यांना रोखून धरत संताप व्यक्त केला. बुलढाणा जिल्ह्यातही ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवू नयेत, अशी भूमिका मांडल्याचा उल्लेख करत नागरिकांनी प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा दावा केला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात पूर्वसूचना न देता स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यानंतर वीजबिलात चार ते पाच पट वाढ झाल्याचा दावा करत नागरिकांनी महावितरणविरोधात घोषणाबाजी केली. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथेही वाढीव वीजबिलांच्या निषेधार्थ ग्राहकांनी महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. तर यवतमाळमध्ये एका ग्राहकाच्या घरी स्मार्ट मीटर न बसविताच पाच महिन्यांपासून वीजबिले पाठविल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकारामुळे महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, विधानसभेत बोलताना फडणवीस यांनी स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढत नसून, वाढलेल्या वीजवापरामुळे आणि उष्णतेच्या लाटेमुळे (हिटवेव्ह) वापर वाढल्याने बिलांमध्ये वाढ झाल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, राज्यभरातून वाढीव बिले, सक्तीची अंमलबजावणी आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत येणाऱ्या तक्रारींमुळे स्मार्ट मीटरचा मुद्दा अधिकच तापला आहे. ग्राहकांचा वाढता रोष लक्षात घेता सरकार आणि महावितरणने यावर स्पष्ट भूमिका घेऊन जनतेच्या शंकांचे निरसन करण्याची मागणी विविध स्तरांतून होत आहे.


### महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

नागरिकांनी प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा दावा केला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात पूर्वसूचना न देता स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यानंतर वीजबिलात चार ते पाच पट वाढ झाल्याचा दावा करत नागरिकांनी महावितरणविरोधात घोषणाबाजी केली. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथेही वाढीव वीजबिलांच्या निषेधार्थ ग्राहकांनी महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. तर यवतमाळमध्ये एका ग्राहकाच्या घरी स्मार्ट मीटर न बसविताच पाच महिन्यांपासून वीजबिले पाठविल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकारामुळे महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## जळगाव विमानतळ रस्त्यावर पहाटे भीषण अपघात

### भरलेली आयशर रॅलिंगला धडकून पलटी



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव विमानतळ रस्त्यावर मंगळवारी पहाटे टमाट्यांनी भरलेल्या आयशर मालवाहू वाहनाचा भीषण अपघात झाला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने आयशर सिमेंटच्या रॅलिंगला धडकून रस्त्यावर पलटी झाली. हा अपघात पहाटे ४.०० ते ४.३० वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. प्राथमिक माहितीनुसार, टमाट्यांचे कॅरेट घेऊन आयशर वाहन विमानतळाच्या दिशेने जात होते. रस्ता ओलांडत असताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि वाहन थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंटच्या रॅलिंगवर आदळले. धडक इतकी जोरदार होती की वाहन रस्त्याच्या मधोमध पलटी झाले. रस्त्यावर टमाट्यांचा सडा अपघातामुळे वाहनातील टमाट्यांचे शेकडो कॅरेट रस्त्यावर विखुरले गेले. त्यामुळे संपूर्ण रस्त्यावर टमाट्यांचा सडा पडला आणि मोठ्या प्रमाणात मालाचे नुकसान झाले. पहाटेची वेळ असल्याने वाहतुकीची वर्दळ कमी होती. अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. वाहतूक काही काळ विस्कळीत अपघातानंतर विमानतळ रस्त्यावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहन आणि विखुरलेले कॅरेट बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले. या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. चालक सुरक्षित आहे की जखमी, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

## शिरपूरच्या होळनांथे परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर (धुळे)| प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील होळनांथे गावासह परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुरेश दलपतसिंग राजपूत यांच्या शेतात बिबट्या आढळून आल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.
याच शेतातील गायीच्या वासरावर बिबट्याने हल्ला करून त्यास गंभीर इजा केल्याने शेतकऱ्याचे पशुधनाचे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या वेळी शेतात जाणेही धोकादायक बनले आहे.
घटनेची माहिती मिळताच शेतकऱ्यांनी वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे (Camera Traps) बसवले आहेत.

## अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविले

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी :** मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती' योजनेअंतर्गत अर्ज मागविण्यात आले आहेत. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या आणि २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी २७ जुलै २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा




भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) यांच्या मुंबई शहर-उपनगर जिल्हा कार्यालयाने केले आहे. या शिष्यवृत्तीसाठी मातंग समाजातील मांग, मातंग, मिनी मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी आणि मादिगा या १२ पोटजातींतील इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शाखेतील ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी पात्र असतील. अर्जासोबत जातीचा दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रिका, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो तसेच पुढील वर्गात प्रवेश घेतल्याचा पुरावा आदी कागदपत्रांच्या दोन प्रती जोडणे आवश्यक आहे. पूर्ण अर्ज स्वतःचा संपूर्ण पत्ता आणि भ्रमणध्वनी क्रमांकासह जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई गृहनिर्माण भवन, कलानगर, तळमजला, रूम क्र. ३३, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०००५१ या पत्त्यावर २७ जुलै २०२६ पूर्वी पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आमदार चंद्रकांत पाटील यांच्या मध्यस्थीने फूलगावच्या लोकनियुक्त सरपंचांचे उपोषण मागे

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यातील फूलगाव येथील लोकनियुक्त सरपंच श्याम फुलगावकर यांनी विविध मागण्यांसाठी १३ जुलैपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण शिवसेना आमदार चंद्रकांत पाटील यांच्या मध्यस्थीने मंगळवारी मागे घेण्यात आले. सरपंच श्याम फुलगावकर यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप करत, ग्रामपंचायत कार्यालयाला बेकायदेशीर कुलूप लावणाऱ्या तसेच शासकीय कामात



अडथळा निर्माण करणाऱ्या संबंधित व्यक्ती व ग्रामपंचायत सदस्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली होती.

उपोषणाची माहिती मिळताच आमदार चंद्रकांत पाटील यांनी गटविकास अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून संबंधित मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यापूर्वी प्रशासनाने लेखी आश्वासन दिले होते, मात्र त्याबाबत समाधान न झाल्याने उपोषण सुरूच ठेवण्यात आले होते. यानंतर आमदार चंद्रकांत पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन सरपंच श्याम फुलगावकर यांच्याशी चर्चा केली. ग्रामपंचायतीच्या कामकाजात अडथळा आणणाऱ्या व्यक्तींविरोधात आवश्यक गुन्हे दाखल करण्याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सरपंच श्याम फुलगावकर यांच्यासह जळगाव येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन ग्रामपंचायतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जिल्ह्याचे पालकमंत्री यांचीही लवकरच भेट घेऊन गावाच्या विकास निधीचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पिंपळनेरमध्ये बाळंतपणा नंतर महिलेचा मृत्यू

### नातेवाईकांकडून रुग्णालयावर दगडफेक



जन सम्राट टाईम्स

**पिंपळनेर | प्रतिनिधी :** पिंपळनेर येथील एका खासगी रुग्णालयात बाळंतपणानंतर २५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी संबंधित रुग्णालयावर दगडफेक केली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली असून, प्रकरणाचा तपास सुरू आहे. मृत महिलेचे नाव पूनम सोन्या अहिरे (वय २५, रा. देगाव) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रसूतीसाठी त्यांना पिंपळनेर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सायंकाळी त्यांनी एका मुलीला जन्म दिला. मात्र, प्रसूतीनंतर त्यांची प्रकृती अचानक गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. नातेवाईकांचा वैद्यकीय हलगर्जीपणाचा आरोप महिलेच्या मृत्यूनंतर नातेवाईकांनी उपचारात हलगर्जीपणा झाल्याचा आरोप केला. या घटनेची माहिती मिळताच देगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने रुग्णालयाबाहेर जमा झाले. तणाव वाढल्यानंतर जमावातील काही व्यक्तींनी रुग्णालयावर दगडफेक केली.
पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रुग्णालयात इतर रुग्णांवर उपचार सुरू असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी आणि स्थानिकांनी जमावाला शांततेचे आवाहन केले. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. महिलेच्या मृत्यूप्रकरणी संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. तसेच काही नागरिकांनी संबंधित डॉक्टरांविरोधात गंभीर आरोप केले असून, या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी होणे अपेक्षित आहे. या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. दरम्यान, या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने नागरिक जमले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढविला असून, घटनेचा सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. पिंपळनेर येथील एका खासगी रुग्णालयात बाळंतपणानंतर २५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी संबंधित रुग्णालयावर दगडफेक केली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली असून, प्रकरणाचा तपास सुरू आहे. मृत महिलेचे नाव पूनम सोन्या अहिरे (वय २५, रा. देगाव) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रसूतीसाठी त्यांना पिंपळनेर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## समता सैनिक दलाच्या जळगाव जिल्ह्याची संघटनात्मक बैठक उत्साहात संपन्न

### सामाजिक न्याय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार करण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** समता सैनिक दलाच्या जळगाव (मध्य) जिल्ह्याची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्य संघटक विजय निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.
बैठकीत संघटन विस्तार, वैचारिक बांधिलकी, शिस्तबद्ध कार्यपद्धती, प्रशिक्षित कार्यकर्त्यांची निर्मिती तसेच आगामी संघटनात्मक उपक्रमांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी जळगाव शहर, जळगाव ग्रामीण, धरणगाव आणि



जामनेर तालुक्यांसाठी समता सैनिक दलाच्या मध्य विभाग प्रचारक समितीची सर्वानुमते घोषणा करण्यात आली. प्रचारक समितीत जळगाव शहरातून श्याम उपाध्याय, विनोद आढळे, सुरेंद्र सुरवाडे, बळीराम पाथरवट, राजेंद्र तायडे आणि शोभाताई सपकाळे, जळगाव ग्रामीणमधून एकनाथ सोनवणे, संजय नावकर व प्रदीप नाईक, तर धरणगाव तालुक्यातून दगडू पाथरवट, सुनिता पाथरवट, अनिता नन्नवरे, संगीता शिरसाट आणि रंजना अशोक शिरसाट यांची प्रचारक म्हणून निवड करण्यात आली. बैठकीत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गावागावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचे, नवीन सदस्य नोंदणी वाढविण्याचे तसेच युवक, युवती आणि महिलांना संघटनेशी जोडून संघटन अधिक सक्षम करण्याचे आवाहन करण्यात आले. राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांनी वैचारिकदृष्ट्या सक्षम, शिस्तप्रिय आणि समाजनिष्ठ प्रचारकांची फळी उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. राज्य संघटक विजय निकम यांनी मध्य विभागातील प्रत्येक गावात समता सैनिक दलाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रचारक समिती प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला.

### यांची होती यावेळी उपस्थिती

समता सैनिक दलाच्या जळगाव (मध्य) जिल्ह्याची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्य संघटक विजय निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीला चाळीसगाव तालुका अध्यक्ष महेंद्र जाधव तसेच चाळीसगाव शहर अध्यक्ष विशाल पगारे यांची विशेष उपस्थिती होती. बैठक यशस्वी करण्यासाठी अनिताताई कापुरे, लताताई पाथरवट, संजय सपकाळे, सुधीर सैंदाणे आणि लक्ष्मीबाई मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.शि प्रचारकांची फळी उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. राज्य संघटक विजय निकम यांनी मध्य विभागातील प्रत्येक गावात समता सैनिक दलाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रचारक समिती प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला. बैठकीचा समारोप समता सैनिक दल अधिक सक्षम, शिस्तबद्ध, वैचारिक आणि जनाधारित संघटना म्हणून उभी करण्याचा दृढ संकल्प करून करण्यात आला.

# कचऱ्यात हरवलेला सोन्याचा दागिना शोधून परत करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार

## तीन तास कचऱ्यात शोधमोहीम • सोन्याचा दागिना सुखरूप परत

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जनसेवेचा आदर्श घालून देणाऱ्या धुळे महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागातील घंटागाडी कर्मचारी सागर अहिरे, महेश घोरपडे तसेच मुकादम मयूर अशोक आघाव यांचा प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक ललित गंगाधर माळी आणि नगर कॉलनीतील नागरिकांच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांनी या कर्मचाऱ्यांसाठी ₹५,००१ चे रोख बक्षीस जाहीर करून त्यांच्या प्रामाणिक कार्याचा गौरव केला. घडलेली घटना मनाला स्पर्श करणारी होती. नगर कॉलनीतील रहिवासी रोहिणीताई सोनार यांच्या घरी साफसफाई सुरू असताना त्यांच्या मुलीने घरातील कचरा घाईघाईने घंटागाडीत टाकला. काही वेळानंतर कचऱ्यासोबत घरातील मौल्यवान सोन्याचा दागिना देखील चुकून टाकला गेल्याचे लक्षात आले. यानंतर त्यांनी तातडीने घंटागाडी कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून मदत मागितली. घटनेची माहिती मिळताच सागर अहिरे आणि महेश घोरपडे यांनी कोणताही कंटाळा न करता तब्बल तीन तास कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शोधमोहीम राबवली.

अखेर त्यांच्या चिकाटीला यश आले आणि हरवलेला सोन्याचा दागिना शोधून संबंधित कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आला. त्यांच्या या प्रामाणिकपणामुळे नागरिकांमध्ये समाधान आणि



कृतज्ञतेची भावना निर्माण झाली. या प्रेरणादायी घटनेची माहिती नगरसेवक ललित गंगाधर माळी यांनी आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांना दिली. ही बाब समजताच आमदारांनी या कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक सेवेचे कौतुक करत ₹५,००१ चे बक्षीस जाहीर केले. यावेळी आमदार अनुप भैय्या अग्रवाल म्हणाले, "धुळे महानगरपालिकेला अशाच प्रामाणिक, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांची गरज आहे. अशा कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. त्यांच्या कार्याचा गौरव होणे ही संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे." नगरसेवक ललित माळी यांनीही स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत, "स्वच्छता कर्मचारी हे शहराचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही परिस्थिती असो, ते नागरिकांच्या आरोग्यासाठी सातत्याने काम करतात. त्यांच्या प्रामाणिक कार्याचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे," असे सांगितले. या सत्कार सोहळ्यास रेखाताई कुलकर्णी, ठाकरे ताई, महाले ताई, पल्लवी सौंदाणे, प्रतिभा पाटील, तामखाने मावशी यांच्यासह कॉलनीतील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अनेक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि जनसेवेचा संदेश देणाऱ्या या घटनेमुळे धुळे शहरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याबद्दल नागरिकांमध्ये नव्याने आदराची भावना निर्माण झाली आहे.

### कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शोधमोहीम राबवली

धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांनी या कर्मचाऱ्यांसाठी ₹५,००१ चे रोख बक्षीस जाहीर करून त्यांच्या प्रामाणिक कार्याचा गौरव केला. घडलेली घटना मनाला स्पर्श करणारी होती. रोहिणीताई सोनार यांच्या घरी साफसफाई सुरू असताना त्यांच्या मुलीने घरातील कचरा घाईघाईने घंटागाडीत टाकला. काही वेळानंतर कचऱ्यासोबत घरातील मौल्यवान सोन्याचा दागिना देखील चुकून टाकला गेल्याचे लक्षात आले. यानंतर त्यांनी तातडीने घंटागाडी कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून मदत मागितली. घटनेची माहिती मिळताच सागर अहिरे आणि महेश घोरपडे यांनी कोणताही कंटाळा न करता तब्बल तीन तास कचऱ्याच्या ढिगाऱ्यात शोधमोहीम राबवली.

# सोनम वांगचूक यांना राजाराम खरात यांचे भावनिक आवाहन

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी:|** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राजाराम खरात यांनी त्यांना भावनिक आवाहन करत देशहितासाठी उपोषण थांबविण्याची विनंती केली आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात देशाला व समाजाला सोनम वांगचूक यांच्या नेतृत्वाची आणि मार्गदर्शनाची भविष्यातही आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

राजाराम खरात यांनी म्हटले आहे की, "देशाच्या हितासाठी आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आपण उभारलेला लढा प्रेरणादायी आहे. मात्र, आपल्या आरोग्याची आम्हाला अधिक चिंता आहे. आपण जिवंत राहून हा संघर्ष अधिक प्रभावीपणे पुढे नेऊ शकता." त्यांनी पुढे म्हटले की, "सध्याच्या परिस्थितीत जनहिताचे निर्णय तातडीने होतील, अशी अपेक्षा कमी असली तरी संघर्ष थांबविण्याची गरज नाही. मात्र, उपोषणामुळे आपल्या आरोग्यावर होणारा परिणाम गंभीर ठरू शकतो. त्यामुळे आपण उपोषण मागे घ्यावे." खरात यांनी अशीही इच्छा व्यक्त केली की, सोनम वांगचूक यांच्या समर्थकांमधील पाच कार्यकर्त्यांनी मोसंबीचा ज्यूस देऊन त्यांचे उपोषण सोडवावे. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राजाराम खरात यांनी त्यांना भावनिक आवाहन करत देशहितासाठी उपोषण थांबविण्याची विनंती केली आहे. "देशासाठी आपले आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे," असे सांगत त्यांनी उपोषण समाप्त करण्याचे आवाहन केले. या निवेदनामुळे सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, विविध स्तरातून त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# जयश्री पाटील व प्रतीक्षा पाटील यांना समाज रत्न'

## राष्ट्रीय राजपूत करणी सेनेकडून सन्मान



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ |। प्रतिनिधी :** महाराणा प्रताप जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा जयश्री पाटील आणि प्रतीक्षा पाटील यांना समाजजागृती व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'राजपूत महिला समाज रत्न (समाज भूषण) पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. राष्ट्रीय राजपूत करणी सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष स्व. सुखदेवसिंह गोगामेडी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षा शीला सुखदेवसिंह गोगामेडी, राष्ट्रीय उपाध्यक्ष योगेंद्रसिंह कट्यार यांच्या हस्ते तसेच परमपूज्य महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांच्या आशीर्वादाने हा सन्मान करण्यात आला. राजपूत समाजातील महिलांमध्ये जनजागृती निर्माण करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी आनंदसिंह ठोके, विलासदादा पाटील, दामोदर राजपूत, संदीप राणा, डॉ. विश्वजित सिसोदिया, विठ्ठलसिंह मोरे यांच्यासह राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्यातील विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रदेश कार्यकारी अध्यक्ष प्रवीणसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. महाराणा प्रताप जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा जयश्री पाटील आणि प्रतीक्षा पाटील यांना समाजजागृती व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'राजपूत महिला समाज रत्न (समाज भूषण) पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना जयश्री पाटील आणि प्रतीक्षा पाटील यांनी सांगितले की, "हा सन्मान समाजाप्रती केलेल्या कार्याची पावती असून, सारिका ताई पाटील यांच्या प्रेरणेने समाजसेवा अधिक जोमाने करण्याची ऊर्जा या पुरस्कारातून मिळाली आहे." या उल्लेखनीय यशाबद्दल समाजबांधवांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दोघींवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# डेंग्यू प्रतिरोध महिन्यानिमित्त वडजीत जनजागृती; विद्यार्थ्यांना प्रतिबंधात्मक उपायांची माहिती!

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत संपूर्ण जुलै महिना 'डेंग्यू प्रतिरोध महिना' म्हणून साजरा केला जात असून, या अभियानाअंतर्गत नागरिकांमध्ये डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भडगाव तालुक्यातील वडजी येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सहायक संचालक (हिवताप), नाशिक डॉ. विवेक खतगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर आणि जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ तसेच पिंपरखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. वडजी येथील टी. आर. पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमाचे नियोजन आरोग्य सेवक राजेंद्र खरे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना



डेंग्यूची लक्षणे, आजाराचा प्रसार, प्रतिबंधात्मक उपाय, डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नष्ट करण्याचे महत्त्व तसेच घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी "आठवड्यातून एक दिवस – कोरडा दिवस", घराभोवती साचलेले पाणी त्वरित काढून टाकणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, कुलर, टाक्या, टायर आणि इतर पाणीसाठ्यांची नियमित स्वच्छता करणे तसेच ताप आल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. आरोग्य विभागाने विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत डेंग्यू प्रतिबंधाचा संदेश पोहोचविण्याचे आवाहन करत,जनसहभागाच्या माध्यमातून डेंग्यूमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत संपूर्ण जुलै महिना 'डेंग्यू प्रतिरोध महिना' म्हणून साजरा केला जात असून, या अभियानाअंतर्गत नागरिकांमध्ये डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भडगाव तालुक्यातील वडजी येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले वडजी येथील टी. आर. पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमाचे नियोजन आरोग्य सेवक राजेंद्र खरे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना डेंग्यूची लक्षणे, आजाराचा प्रसार, प्रतिबंधात्मक उपाय, डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नष्ट करण्याचे महत्त्व तसेच घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# BBLO व SIR कामकाजात शिक्षकांना धमक्या व अपमानास्पद वागणुकीचा आरोप

## समर्थ कामगार संघटनेची CPS-174 कार्यालयात धडक

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना BLO (Booth Level Officer) आणि विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) कामकाजादरम्यान काही CPS कार्यालयांतील अधिकाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचा आरोप म्युनिसिपल समर्थ कामगार संघटनेने (कोड क्रमांक ५३) केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, शिक्षक शाळेतील अध्यापनाचे काम पूर्ण करून SIR मोहिमेसाठी नियुक्त ठिकाणी जात असताना काही अधिकारी त्यांच्यावर अवास्तव कामाचे लक्ष्य (टार्गेट) पूर्ण करण्यासाठी दबाव टाकत आहेत. तसेच "वेतन घेत आहात, तर दिलेले काम करावेच लागेल" अशा प्रकारची अवमानकारक भाषा वापरून शिक्षकांना धमकावले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. याबाबत म्युनिसिपल समर्थ कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी CPS-




174 कार्यालयाला भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांकडे शिक्षकांशी सन्मानपूर्वक आणि कायदेशीर पद्धतीने वागण्याची मागणी केली. कोणत्याही शिक्षकाला मानसिक त्रास किंवा अपमानास्पद वागणूक दिली जाऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली. संघटनेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, विरोधी पक्षनेते, शिक्षक आमदार आणि लोकप्रतिनिधींनी या विषयात लक्ष घालून शिक्षकांचा सन्मान व सुरक्षितता अबाधित राहील, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. संघटनेचे सहसरचिटणीस मुंजा शिवाजी गिरी यांनी सांगितले की, "गुरूला नेहमी गुरूचे स्थान मिळाले पाहिजे. शिक्षकांचा सन्मान राखणे ही प्रशासनाची नैतिक जबाबदारी आहे. कोणत्याही शिक्षकाला धमकावणे किंवा अपमानास्पद वागणूक देणे सहन केले जाणार नाही." या मागणीसाठी संघटनेचे सरचिटणीस ऋषिकांत घोसाळकर, सहसरचिटणीस मुंजा शिवाजी गिरी, बबन धोंडू बोरकर, भूपेंद्र पाटील, खजिनदार दिलीप रासम यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. संघटनेने इशारा दिला आहे की, शिक्षकांचा सन्मान, सुरक्षितता आणि शिक्षण व्यवस्थेचा दर्जा अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक असल्यास लोकशाही मार्गाने पुढील आंदोलन करण्यात येईल. शिक्षक व कर्मचाऱ्यांना BLO (Booth Level Officer) आणि विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) कामकाजादरम्यान काही CPS कार्यालयांतील अधिकाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याचा आरोप म्युनिसिपल समर्थ कामगार संघटनेने (कोड क्रमांक ५३) केला आहे.

# धुळ्यात अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** धुळे शहरात अन्न व औषध प्रशासनाने मंगळवारी (दि. १४ जुलै) विविध डेअरी व मिठाई व्यावसायिकांवर धडक कारवाई करत दोन आस्थापना तात्काळ बंद केल्या. तसेच दोन डेअरींमधून म्हशीच्या व गायीच्या दुधाचे चार नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत त्रिमूर्ती डेअरी, स्टेशन रोड आणि ओम डेअरी, वाडीभोकर रोड,



धुळे या आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यावेळी म्हशीच्या व गायीच्या दुधाचे प्रत्येकी नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले.तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींप्रकरणी संबंधित आस्थापनांना नोटीस बजावण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान, देवरे हॉस्पिटलजवळील एस. बालाजी स्वीट्स या आस्थापनाच्या तपासणीत मुदतबाह्य अन्नपदार्थ विक्रीसाठी साठवलेले असल्याचे आढळून आले. तसेच अस्वच्छता, अन्नपदार्थांवर माशांचा प्रादुर्भाव आणि अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील विविध तरतुदींचे उल्लंघन झाल्याने संबंधित आस्थापना तात्काळ बंद करण्यात आली. याशिवाय, पारोळा रोडवरील शिवाजी महाराज पुतळ्याजवळील मथुरा स्वीट्स येथे विनापरवाना अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील नियमांचे उल्लंघन झाल्याने या आस्थापनेचाही उत्पादन विभाग तात्काळ बंद करण्यात आला. ही कारवाई सहाय्यक आयुक्त (अन्न) गो. वी. माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांनी केली.

# जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीन होणार लोकार्पण

## अमीन पटेल यांच्या पाठपुराव्याला यश



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक एमआरआय (MRI) मशीन उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातील तसेच परिसरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. या सुविधेचे लोकार्पण येत्या १५ ऑगस्ट रोजी होणार असून, अनेक वर्षांपासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे काँग्रेसचे ज्येष्ठ माजी नगरसेवक तथा समाजसेवक अमीन पटेल यांच्या प्रयत्नांना यश आल्याचे सांगितले जात आहे. अमीन पटेल हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांना उपचार, मार्गदर्शन आणि विविध शासकीय आरोग्य सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीन उपलब्ध व्हावी, यासाठी त्यांनी आंदोलने, निवेदने, जिल्हा प्रशासन व रुग्णालय प्रशासनाशी पाठपुरावा तसेच संबंधित मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन सातत्याने मागणी लावून धरली होती. या प्रयत्नांनंतर जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक एमआरआय मशीन उपलब्ध झाली असून, आता जिल्ह्यातील रुग्णांना एमआरआय तपासणीसाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. यामुळे वेळ, खर्च आणि उपचारासाठी होणारा विलंबही कमी होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, अमीन पटेल यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे यांच्या समवेत नव्याने बसविण्यात आलेल्या एमआरआय मशीनची पाहणी केली. यावेळी मशीनच्या कार्यपद्धतीची माहिती घेण्यात आली तसेच रुग्णांना ही सेवा अधिक प्रभावी आणि वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. याच वेळी एमआरआय मशीनचे लोकार्पण १५ ऑगस्ट रोजी होणार असल्याची माहिती देण्यात आली. या पाहणीवेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष भाई नगराळे, सेवा दलाचे शहराध्यक्ष राजेंद्र खैरनार, धुळे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा भावना गिरासे, अब्दुल हक, नवीन अख्तर, सुफिक अहमद, अबुलास खान, आसिफ अन्सारी, रईस अहमद, मुजाहिद हुसेन, आसिफ भाई, वकील अहमद, कुरबान अन्सारी आदी उपस्थित होते.

# डॉ.आंबेडकर वसतिगृहातील विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने खळबळ

## विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा आरोप; वसतिगृहाच्या दुरवस्थेची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

जन सम्राट टाईम्स

**शहादा (नंदुरबार) | प्रतिनिधी** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील काही विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या आहारामुळे विषबाधा झाल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर पालक आणि विविध सामाजिक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वसतिगृहात पुरविण्यात येणाऱ्या अन्नाचा दर्जा निकृष्ट असल्याने विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा (फूड पॉइझनिंग) झाल्याचा आरोप आहे. काही विद्यार्थ्यांच्या तोंडाला फेस आल्याची माहिती समोर आली असून, त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच



वसतिगृहाची पाहणी करून तेथील सुविधांबाबत गंभीर आक्षेप नोंदविले. पँथर सेनेने आरोप केला की, वसतिगृहातील खोल्या अस्वच्छ असून गाद्या व बेड जीर्ण अवस्थेत आहेत. शौचालये व स्नानगृहांची स्थिती अत्यंत खराब असून काही ठिकाणी दरवाजे नसल्याचे निदर्शनास आले. पाणीपुरवठ्याची अपुरी व्यवस्था असल्याने विद्यार्थ्यांना वरच्या मजल्यावर पाणी नेण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचाही आरोप करण्यात आला. तसेच वर्षभरापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या वॉशिंग मशीन वापरात नसल्याचेही त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्यात यावी, दोषी अधिकारी आणि संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी पँथर सेनेने केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. दरम्यान, काही विद्यार्थ्यांवर अद्याप उपचार सुरू असल्याचे समजते. या घटनेबाबत प्रशासनाकडून अधिकृत अहवाल व तपासाची प्रतीक्षा असून, विषबाधेचे नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील काही विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या आहारामुळे विषबाधा झाल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306